## महाराष्ट्र शासन

**क्र. औन्यामुं-०६२२/प्र.क्र.९६/काम-६**
**उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २४ जून २०२५

**विषय :-** कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर कर्तव्य बजावत असतांना कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाने मृत्यू झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना रु. ५० लक्ष सानुग्रह सहाय्य मंजूरीबाबत

**वाचा :-** १. शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.४/व्यय-९ दि. २९.५.२०२० व १४.०५.२०२१
२. वित्त विभागाचे पत्र क्र. न्यायप्र-२०२०/सं.क्र.४/व्यय-९ दि. २८.०१.२०२१
३. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. औन्यामुं/आस्था-१/१११५ दि. ०६.०६.२०२२, औन्यामुं/आस्था-१/४२३७ दि. १९.१२.२०२३

**ज्ञापन :-**

औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे बेलिफ पदावर कार्यरत असलेले कै. श्री. प्रकाश गोपाळराव जवळे यांचा कोविड-१९ विषाणूची लागण झाल्याने दि.२३.०३.२०२१ रोजी मृत्यू झाला आहे.

प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दि. ०६.०६.२०२२ व १९.१२.२०२३ च्या पत्राने श्री. प्रकाश गोपाळराव जवळे यांच्या कुटूंबियांना रु. ५०.०० लक्ष सानुग्रह सहाय्य मंजूरीचा प्रस्ताव सादर केला आहे.

प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी श्री. प्रकाश गोपाळराव जवळे यांना न्यू ईरा हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयूट, नागपूर येथे दाखल करण्यापूर्वी १४ दिवसांच्या काळात त्या कार्यालयात हजर असल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

न्यू ईरा हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च इन्स्टीटयूट, नागपूर यांनी कै. श्री. प्रकाश गोपाळराव जवळे यांचा मृत्यू कोविड-१९ या रोगाच्या संसर्गामुळे झाला असल्याचे प्रमाणित केले आहे.

श्री. प्रकाश गोपाळराव जवळे यांच्या पत्नी श्रीमती अभिनयश्री प्रकाश जवळे यांनी रु. ५०.०० लक्ष सानुग्रह सहाय्य मिळण्याबाबत अर्ज दि. ०४.०४.२०२२ रोजी प्रबंधक, औद्योगिक न्यायालय यांचेकडे सादर केला आहे.

या संदर्भात सर्व आवश्यक अटी व बाबींची पूर्तता होत असल्याने औद्योगिक न्यायालय, नागपूर येथे बेलिफ पदावर कार्यरत असलेले श्री. प्रकाश गोपाळराव जवळे यांच्या कुटूंबियांना रक्कम रु. ५०.०० (अक्षरी-रु. पन्नास लक्ष फक्त) सानुग्रह सहाय्य म्हणून प्रदान करण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

उक्त खर्च मागणी क्र. के-०४, २२३०-कामगार व सेवायोजन १०१, औद्योगिक संबंध (००) (०१) औद्योगिक लवाद न्यायालय (२२३००४८८-१३) कार्यालयीन खर्च योजनेतर या लेखाशिर्षाखाली २०२५-२६ या वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर ज्ञापन वित्त विभाग शासन निर्णय दि. २९.०५.२०२० व दि. १४.०५.२०२१ तसेच वित्त विभागाचे पत्र क्र. न्यायप्र-२०२०/सं.क्र.४/व्यय-९ दि. २८.०१.२०२१ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६२४११५२१०१११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6BB468A80B20659CCB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2025.06.24 11:53:14 +05'30'

**( रोशनी कदम-पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई
२. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई
३. महालेखापाल - १, (लेखापरीक्षा / लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
४. जिल्हा कोषागार अधिकारी नागपूर
५. निवड नस्ती (कामगार-६).